मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# आवाहन

## महाराष्ट्रातील मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात संशोधन करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्था / मंडळासाठी अर्थसाहाय्य योजना

**महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील** उद्दिष्ट क्र. १. - महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या तिनही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविणे, **उद्दिष्ट क्र. ४** - शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे. या उद्दिष्टांना अनुसरून **राज्य मराठी विकास संस्थेमार्फत महाराष्ट्रातील मराठी भाषेसंदर्भात संशोधन करणारे संस्था / मंडळ यांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी पुढील योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.**

**"या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था / मंडळांना प्रत्येकी रु. ५ लक्षच्या मर्यादेत अर्थसाहाय्य करणे. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती, निकष, नियम व अटी पुढीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत."**

महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा व मराठी साहित्य या संदर्भात दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्था/ मंडळांना अर्थसाहाय्य देण्याच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेने, २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी संस्था/ मंडळांना अर्थसाहाय्य देण्यासाठी पात्र संस्था/ मंडळ यांनी दिनांक : ३० नोव्हेंबर, २०२२ या योजनेसंदर्भासाठीचा विहित माहितीचा ऑनलाईन भरावयाचा अर्ज तसेच इतर तपशील संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर **'महाराष्ट्रातील मराठी संशोध संस्था/ मंडळांना अर्थसाहाय्य' या नावाने दर्शविलेल्या** शीर्षकावर टीक करून ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे व इतर माहिती स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात संस्थेच्या project4.rmvs@gmail.com या इ-पत्त्यावर पाठवावी. सदर अर्थसाहाय्याचा अर्ज विहित नमुन्यात दिनांक : ३० नोव्हेंबर, २०२२ पर्यंत राज्य मराठी विकास संस्थेकडे ऑनलाईन स्वरूपात सादर करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीनंतर येणाऱ्या अर्जांचा अर्थसाहाय्यासाठी विचार केला जाणार नाही.

महाराष्ट्रातील मराठी संशोधन संस्था/ मंडळांना सदर योजनेसंदर्भातील कार्यपद्धती, निकष, नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत.

१. अर्जदार संस्था / मंडळ मराठी भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास व संशोधन करणारी असावी. **बहुउद्देशीय संस्था नसावी.**
२. सदर जाहिरातीस अनुसरून महाराष्ट्रातील संस्था / मंडळे यांनी त्यांचा प्रकल्प / उपक्रम / योजना यांबाबतचा प्रस्ताव (अंदाजित आर्थिक तपशिलासह) सोबत जोडलेल्या विहित ऑनलाईन अर्जासह व इ-टपालद्वारे राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित कालमर्यादेत पाठविणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेकडून अर्थसाहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने, अर्जदार साहित्य मंडळ व संस्थांनी अर्ज परस्पर शासनास सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत राज्य मराठी विकास संस्थेकडे अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

४. अर्जदार मराठी संशोधन संस्था/ मंडळांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक असेल.

५. राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने मंजूर होणारे अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व यासंदर्भातील अनुदानाचे सर्वसाधारण नियम व अटी संबंधित संस्था / मंडळांना लागू होतील.

६. अर्जदार मराठी भाषा संस्था / मंडळांनी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व त्या वर्षातील जमा खर्चाचा तपशील विनियोजन विवरणपत्रासह, विहित कालमर्यादेत अनुदान मंजुरीच्या वित्तीय वर्ष अखेरपर्यंत राज्य मराठी विकास संस्थेस सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर संस्था पुढील काळात अनुदान मंजुरीसाठी अपात्र ठरेल.

७. अर्जदार संस्था/ मंडळाने मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant) लेखापरिक्षित केलेले लेखा अहवाल राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल हा अर्जदार संस्थेचा सदस्य नसावा.

८. राज्य मराठी विकास संस्थेने दिलेल्या निधीचा उपयोग मराठी भाषा, साहित्य या संदर्भात संशोधन विषयक उपक्रम राबविण्यासाठीच करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र संस्थेने देणे बंधनकारक राहील.

९. संस्था/ मंडळाने दिलेल्या अनुदानाच्या खर्चाचा हिशेब, शासनमान्य अधिकृत लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. संस्था/ मंडळाने जितक्या खर्चाचा तपशील रा.म.वि.संस्थेस सादर केला आहे, तेवढीच रक्कम देय राहील.

११. अर्जदार संस्था/ मंडळांच्या अर्जांची छाननी करेल व जी संस्था/ मंडळे राज्य मराठी विकास संस्थेचे निकष, नियम व अटींची पूर्तता करतील अशांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करेल.

१२. अर्जदार मराठी संशोधन संस्था/ मंडळ नोंदणी अधिनियम १८६० किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे किंवा सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी झालेली असावी. संस्था/ मंडळ ही ५ वर्षांपूर्वीचे नोंदणीकृत असावे. अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या संस्था/ मंडळ यांचे मुख्य उद्दिष्ट्य मराठी संशोधन व मराठीचा विकास करणे असावे.

१३. अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या संस्था / मंडळ यांनी अर्जाबरोबर पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
  - संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत.
  - संस्था / मंडळ यांच्या सदस्यांनी आर्थिक साह्यासाठी घेतलेल्या निर्णयाची साक्षांकित प्रत.
  - संस्था / मंडळ यांची अद्ययावत माहिती पुस्तिकेची प्रत.
  - संस्था / मंडळ यांची अद्ययावत वार्षिक लेखा अहवालाची प्रत.
  - अर्जासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे तसेच ओळखपत्र म्हणून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढील ३ पैकी २ कागदपत्रांची प्रत जोडण्यात यावी.

    १. आधार कार्ड २. पासपोर्ट ३. वाहन चालवण्याचा परवाना इ. छायांकित प्रत.
  - बँकेच्या धनादेशाची प्रत किंवा बँक खात्याची माहिती असणारी बँक पुस्तिकेच्या पानाची छायांकित प्रत.

१४. अनुदानासाठी केलेल्या अर्जावर व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर अर्जदाराची एक सारखी सही असावी.

१५. संस्थेने मंजूर केलेले अनुदान योग्य प्रकारे उपयोगात आणले गेले नसेल, पुरेशी प्रगती साध्य झालेली नसेल तर कामाच्या कोणत्याही टप्प्यावर मंजूर प्रकल्प बंद करण्याचे अधिकार पूर्णपणे राज्य मराठी विकास संस्थेकडे राखीव असतील.

१६. कोणत्याही स्थापत्यविषयक बांधकाम, फर्निचर खरेदी इत्यादींसाठी हे अनुदान वापरता येणार नाही.

१७. मंजूर योजनेसाठी अनुदान काटेकोरपणे खर्च करण्यात आल्याची खात्री देण्यात यावी. लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित उपयोगिता प्रमाणपत्र व देयकेही सादर करावे.

१८. अनुदान प्राप्त संस्था / मंडळ, या योजनेच्या अंतर्गत मिळालेल्या आर्थिक साहाय्याचा वापर, तो ज्या योजनेसाठी मंजूर केला गेला आहे त्यासाठीच खर्च करेल. तसे करण्यास अयशस्वी ठरणाऱ्या संस्था / मंडळ, यांना सक्षम अशा मंजुरी प्राधिकाऱ्याने निश्चित केलेल्या व्याजासहित अनुदानाची पूर्ण रक्कम परत करणे बंधनकारक असेल.

१९. मंजूर अनुदान कामाच्या स्वरूपाप्रमाणे तीन टप्प्यात देण्यात येईल. आवश्यक तिथे हे टप्पेही वाढवण्यात येतील. प्रत्येक टप्प्याच्या खर्चाच्या बाबींचे लेखापरीक्षण झाल्यानंतर व तसे काम पूर्ण झाल्याचा अहवाल, प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्रासह संस्थेस सादर झाल्यानंतर अंतिम टप्प्याची रक्कम देण्यात येईल.

२०. प्रकल्प कार्याच्या प्रगतीचा अहवाल प्रत्येक महिन्याला संस्थेस पाठविणे बंधनकारक आहे.

२१. अनुदान मंजूर करण्यासाठी संस्था/मंडळाच्या किमान २ पदाधिकाऱ्यांची मुलाखत घेण्यात येईल. या मुलाखतीनंतर प्रत्यक्ष अनुदान मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू होईल.

२२. संस्था/मंडळाने प्रस्तावित केलेला प्रकल्प मंजूर झाल्यानंतर रा.म.वि. संस्था यांच्यामध्ये नोंदणीकृत करार करण्यात येईल.

२३. संस्थेकडे पाठविण्याचा संबंधित कागदपत्रांच्या सर्व पानांवर संस्था प्रमुखांची स्वाक्षरी असावी.